अहवाल लेखन

**गंगाधर बाबा छात्रालय ,गुहा. अनाथआश्रमास भेट.**

महाविद्यालयाचे नाव: प्रवरा ग्रामीण शिक्षण शास्त्र महाविद्यालय, लोणी.

दिनांक: 15/06 /2024 .

ठिकाण : गंगाधर बाबा छात्रालय, गुहा .

विद्यार्थी संख्या : 28

उपस्थिती: सर्व स्टाफ.

प्रवरा ग्रामीण शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील बी.एड प्रशिक्षणार्थी, प्राचार्य व सर्व स्टाफ दिनांक 15 /06/ 2024 रोजी गंगाधर बाबा छात्रालय ,गुहा येथील अनाथआश्रमास सन्मा. नामदार डॉ. श्री. राधाकृष्णजी विखे पाटील साहेब यांच्या 65 व्या वाढदिवसानिमित्त भेट देण्यात आली. या अनाथाश्रमात विद्यार्थी निवासी राहून परिसरामधील शाळा ,कॉलेजमध्ये प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत( एमबीए, इंजिनियर्स, फार्मसी )यासारख्या क्षेत्रात शिक्षण घेऊन स्वतःच्या पायावर उभे राहत आहेत. अनाथ आश्रमात एकूण 78 विद्यार्थी शिक्षण घेत आहे. येथे विद्यार्थ्यांना ग्रंथालय ,मनोरंजनची विविध साधने,निसर्गरम्य शांत परिसर, खेळण्यासाठी मैदान व विविध सोयी उपलब्ध आहेत .श्री. प्रकाश सपकाळ या अनाथाश्रमाचे व्यवस्थापक म्हणून काम पाहतात .डॉ. मांढरे जी.एम.यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वाजे वि.पी. यांनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. चि. अथर्व याच्या हस्ते केक कापून त्याचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्या डॉ. वाजे वि.पी. ,प्राध्यापक, बी.एड प्रशिक्षणार्थी यांनी तेथील विद्यार्थ्यांची माहिती घेतली. ग्रंथालयाला भेट दिली. त्यांच्याशी हितगुज केले. येथील विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, सहकार्यवृत्ती, समायोजन क्षमता, व शिस्त यासारखे गुण दिसून आले. बी.एड प्रशिक्षणार्थ्यांनी व महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना अल्पोपहार दिला व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.अशा प्रकारे खेळीमेळीच्या वातावरणामध्ये वाढदिवस साजरा करण्यात आला.

Date:15/06/2024.



गंगाधर बाबा छात्रालय गुहा येथील विद्यार्थी व बी.एड प्रशिक्षणार्थी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वाजे .वी.पी, व्यवस्थापक श्री. प्रकाश सपकाळ, विद्यार्थी व महाविद्यालय सर्व स्टाफ.



अहवाल लेखन

**जागतिक योग दिवस**

महाविद्यालयाचे नाव: प्रवरा ग्रामीण शिक्षण शास्त्र महाविद्यालय, लोणी.

दिनांक: 21/06 /2024 .

ठिकाण : . प्रवरा ग्रामीण शिक्षण शास्त्र महाविद्यालय, लोणी.

अतिथी: प्रा.हजारे हरीश लक्ष्मण

विद्यार्थी संख्या : 15

उपस्थिती: सर्व स्टाफ.

10 वा. 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' निमित्त महाविद्यालयात प्रा. हजारे हरीश लक्ष्मण यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .दैनंदिन जीवनात योगाचे महत्व निरोगी व सुदृढ जीवनासाठी कसे उपयुक्त आहे,याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येकाने दिवसातून किमान अर्धा तास वेळ काढून योगासने करावे याविषयी त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत काही योग प्रात्यक्षिके करून दाखविले. पवन मुक्तासन नौकासन पश्चिमोत्तासन भुजंगासन सूर्यनमस्कार आदीबाबत मार्गदर्शन केले. या प्रात्यक्षिकांमध्ये विद्यार्थी व महाविद्यालय शिक्षक व शिक्षकेतर सर्व स्टाफ यांनी कृतीयुक्त सहभाग घेतला.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ .वाजे . वि .पी यांनी प्रा. हजारे हरीश लक्ष्मण यांचा गुलाबाचे रोपटे देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे आभार प्रा. मोरे सर यांनी मांडले.



# "International Yoga Day "

**Date 21/06/2024**



Pawanmuktasan



Bhoojagasan Asst. Prof. Harish Hajare Sir



International Yoga Day  Dated on -21/06/2024

Student and Staff Warming up Activity